केसरी पुणे
पुणे, १२ मे २०१६/७

# पुण्याच्या शुभम काजळेला युवा आयर्नमॅन खेळाडूचा किताब



**पुणे** : ऑस्टेललियातील नदीमध्ये ४ किमी पोहणे, १८० किमी सायकलिंग आणि ४२ किमी पळणे असे क्रीडाप्रकार सलग करीत पुण्याच्या नवी पेठेतील शुभम. काजळे याने युवा आयर्नमॅन खेळाडूचा किताब पटकाविला आहे. भारतातून चेन्नई आणि पुणे येथून दोनच स्पर्धक सहभागी झालेल्या या स्पर्धेत जगभरातून आलेल्या २ हजार स्पर्धकांशी झुंज देत त्याने ही कामगिरी केली.

मे महिन्यात ऑस्टेलियामध्ये दरवर्षी ही स्पर्धा आयोजित केली जाते. त्यामध्ये शुभमने मिळविलेल्या या यशाबद्दल पुण्यातील दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अॅकॅडमी आणि शुभम काजळे मित्र परिवारातर्फे त्याचा सन्मान करण्यात आला. नारायण पेठेतील गुप्ते मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाला शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, आकाश कोरगावकर, आनंद सराफ, ऑकॅडमीचे गुणेश पुरंदरे, शुभमचे आजोबा वसंत काजळे, वडील संजय काजळे आदी उपस्थित होते. सन्मानचिन्ह, शाल आणि रोप देऊन त्याला सन्मानित करण्यात आले.

आयर्नमॅन ऑस्टेललिया ही स्पर्धा १७ तासात पूर्ण करणे बंधनकारक असते. परंतु शुभमने १४ तास १७ मिनिटांमध्ये ही स्पर्धा पूर्ण केली. जगभरातील २ हजार स्पर्धकांपैकी सुमारे १ हजार ५०० स्पर्धकांनी ही स्पर्धा पूर्ण केली. त्यामध्ये शुभम हा सर्वात कमी वयाचा युवा स्पर्धक ठरला. यापूर्वी त्याने चेन्नई हाफ आयर्न ट्रॅथलॉन, गोवा ट्रॅथलॉन, म्हैसूर हाफ ट्रॅथलॉन यांसारख्या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता. टिळक तलावावरील प्रशिक्षक कल्पना आगाशे आणि ऑकॅडमीचे गुणेश पुरंदरे यांचे मार्गदर्शन शुभमला मिळाले. नवी पेठेतील रामबाग कॉलनीमध्ये रहात असलेल्या शुभमने सध्या १२ वी कॉमर्सची परीक्षा दिली असून स.प.महाविद्यालयात तो शिकत आहे. स्पर्धेविषयी अनुभव सांगताना शुभम म्हणाला, स्पर्धेदरम्यान ज्या अडचणी आल्या, त्या अडचणी न समजता मी संधी म्हणून त्यांच्याकडे पाहिले. त्यामुळे त्या अडचणींवर मी सहज मात करु शकलो. स्पर्धेकरीता माझी दोन वर्षांपासून तयारी सुरु होती. त्यामध्ये मी दररोज ४ ते ५ तास सायकलिंग, पोहणे आणि २ ते ३ तास पळणे असा सराव केला. यापुढेही अशा अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन विजयी व्हायचे असल्याचे त्याने सांगितले.